# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकांळ)

जा.क्र. ४८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०७/०८/२०१६.

## १) पतसंस्थेतुन सोने तारन पाकीटे चोरून नेल्याने गुन्हा दाखल. :—

दिनांक. मे २०१३ ते १७/०५/२०१६ रोजी दरम्यान यातील आरोपी हे वैभव नगरी सहकारी पत संस्था मर्यादीत पवनी चे कर्मचारी असुन यांना संस्थेने ग्रहकांचे सोने तारन ठेवने व ग्रहकाला परत करण्याचे काम सोपविले असतांना व सोने तारन पाकीटे ठेवण्याची व काढण्याची जबाबदारी आरोपीतांची असतांना त्यानी संगनमत करून कोंढा येथील संस्थेचे तसेच अडयाळ शाखेचा पवनी येथील कार्यालयातील लॉकर मधील एकुण १७३.५५ ग्रॅम वजनाचे अंदाजे कि. ६ लाख रू. ची एकुण १० सोने तारन पाकीटे गाहाळ केली आहेत. असा फिर्यादी श्रीरामलाल सुदामजी तलमले रा.शिवाजी नगर पवनी यांचा संशय असल्याने त्याचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३८१,३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

## २) सायकलच्या वादावरुन मारहान केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे मुलीने तिची सायकल वापरण्या करीता यातील आरोपीस १ वर्ष पुर्वि दिली होती ती सायकल फिर्यादीचे मुलीने प्रकृती बरी नसल्या कारणाने दवाखाण्यात जाण्याकरीता सायकल नेली असता सायकल मागण्याच्या कारनावरून भांडण शिवीगाळ करून आरोपीने फिर्यादीचे मुलीला सायकलने व फिर्यादीस बासाच्या काठीने उजव्या पायाला, हाताला, डावे कनपट्टीवर मारून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवन ी येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

१) इसमाचा मृत्यु . :—

दिनांक ०६/०८/०१६ रोजी १५.४४ वा. दर. यातील फिर्यादीचा नातु मृतक पवन सुधाकर मोघरे वय २० वर्ष, रा. भंडारा हा रात्री जेवन करून आपले रूम मध्ये झोपला असता दि. ०६/०८/०१६ रोजी ला सकाळी उशिरा पर्यत झोपुन उठला नाही म्हणुन दार तोडुन पाहनी केली असता मृतक हा आपले बेडवर चीत अवस्थेत पडुन मृत अवस्थेत दिसुन आला. सरतर्फे फिर्यादी भाजीपाले वय ४७ वर्ष रा. भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी सपोनी. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

प्रभारी. पोलीस उपअधिक्षक
भंडारा (गृह)
दुरध्वनी क. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिति अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.